| CNR No.MHWS040011482022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०७/०६/२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | ०७/०६/२०२२ |
| | निकाल तारीख | : | ०२/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०४ वर्ष ०० म २५ दि |

## भाग 'अ'

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी सुभाष द. तारे)**

**सं.फौ.ख.कं.७५३/२०२२** **निशाणी क्र.८२**
(समन्स खटल्याची संपरिक्षा अवलंबिण्यात आली)

| | |
|---|---|
| गुन्हा नोंद क्र. व पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र.३४०/२०२१ पोलीस ठाणे आसेगांव. |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे आसेगांव, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| प्रतिनिधीत्व | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डी. आरु. |
| आरोपी | **ज्ञानेश्वर एकनाथ हिरडे**,<br>वय ५४ वर्षे, धंदा:- नोकरी,<br>रा. वाशिम, ता. जि. वाशिम. |
| प्रतिनिधित्व | वकील :- सरकाळे |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २२/०९/२०२१ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंदविल्याची तारीख | २३/०९/२०२१ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | ०७/०६/२०२२ |
| आरोपींविरूध्द दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०६/१२/२०२२ |
| पुरावा नोंदविण्यास ठेवलेली प्रथम तारीख | २७/०१/२०२३ |
| पुरावा बंद केल्याची तारीख | ०१/०४/२०२६ |
| निकालाची तारीख | ०२/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधित नाही |

आरोपीबाबत तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नावे | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे संपरिक्षे दरम्यान निरूध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर एकनाथ हिरडे | कलम ४१-अ प्रमाणेची नोटीस दिली. | ०३.११.२२ | कलम २७९, ३०४-अ भा.दं.वि. व कलम १८४ मोटर वाहन कायदा प्रमाणे | निर्दोष मुक्त | लागु नाही | -- |

**भाग 'क'**

फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४

अ. साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरूप/ साक्षीदाराची भुमिका |
|---|---|---|---|
| १ | राजकुमार नामदेव ईगोलकर | २१ | फिर्यादी |
| २ | पंजाब रामचंद्र चव्हाण | ३० | पंच |
| ३ | सुभाष नारायण जाधव | ३३ | साक्षीदार |
| ४ | गजानन नारायण जाधव | ३९ | साक्षीदार |
| ५ | विठ्ठल नारायण जाधव | ५० | साक्षीदार |
| ६ | सचिन श्रीकांत जाधव | ५१ | साक्षीदार |
| ७ | अमोल मोहन भगत | ५२ | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | मारोती नामदेव जाधव | ५८ | साक्षीदार |
| ९ | जावेद जंगली बेनिवाले | ६१ | साक्षीदार |
| १० | गणेश तुकाराम भोयर | ६४ | तपास अधिकारी |

ब. बचावाचे साक्षीदार - निरंक

क. अभियोगपक्षाच्या/बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी -

| **अ.क्र.** | **दस्ताचे स्वरुप** | **निशाणी क्रमांक** | **सिध्दकर्ता** |
|---|---|---|---|
| १ | रिपोर्ट | २२ | साक्षीदार क्र.०१ |
| २ | प्रथम खबर अहवाल | २३ | साक्षीदार क्र.०१ |
| ३ | समजपत्र | ३१ | साक्षीदार क्र.०२ |
| ४ | घटनास्थळ पंचनामा | ३२ | साक्षीदार क्र.०२ |
| ५ | जप्ती पंचनामा | ६५ | साक्षीदार क्र.१० |
| ४ | दिनांक ०३.०१.२०२२ रोजीचे मोबाईल एस.डी.आर., सि.डी.आर. मिळण्याकरीता दिलेले पत्र | ६६ | साक्षीदार क्र. १० |

बचावपक्षाने कबुल केलेल्या दस्तांची यादी -

| **दस्त क्रमांक** | **दस्ताचे स्वरूप** | **निशाणी** |
|---|---|---|
| १ | मरणोत्तर पंचनामा | ६७ |
| २ | शवविच्छेदन अहवाल | ६८ |
| ३ | वाहन पडताळणी अहवाल | ६९ व ७० |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक ०२/०७/२०२६)

**१.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीगत अशी की, दिनांक २२.०९.२०२१ रोजी सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी राजकुमार नामदेव इंगोलकर व नारायण नामदेव जाधव असे मोटारसायकल क्र. एम.एच.३७ ४१८६ याने कासोळा येथे सावडण्याच्या कार्यक्रमाला गेले होते. तेथील कार्यक्रम आटोपून ते दोघे दुपारी १२.०० वाजता निघाले. त्यावेळी नारायण

जाधव हे मोटारसायकल चालवत होते व फिर्यादी पाठीमागे बसले होते. वेळ अंदाजे १२.१५ वाजता कासोळा फाटा येथे वाशिम ते मंगरूळपीर रस्त्यावर ते आले असता रस्ता ओलांडून सार्सीकडे जात असताना मंगरूळपीर बाजूकडून एक पांढ-या रंगाची कार क्र. एमएच ३७ एडी ०९९० ही भरधाव वेगात वाशिमकडे जात होती. त्या कारने त्याच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यामध्ये नारायण जाधव हे जखमी होवून खाली पडले व फिर्यादीला किरकोळ मार लागला. जखमी नारायण जाधव यांना रूग्णवाहिकेने वाशिम येथे नेले असता त्यांना जास्त मार असल्यामुळे अकोला येथे पुढील उपचाराकरीता पाठवण्यात आले. अकोला येथील आयकॉन हॉस्पीटल येथे दिनांक २२.०९.२०२१ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता नारायण जाधव यांचा मृत्यू झाला.

२. दिनांक २३/०९/२०२१ रोजी पोलीस ठाणे आसेगांव येथे दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुद्ध अपराध क्र. ३४०/२०२१ हा भा.दं.वि.चे कलम २७९, ३३७, ३०४-अ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये नोंद करून तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री गणेश भोयर ब.नं. ६४१ यांच्याकडे सोपविण्यात आला.

३. तपासीक अंमलदार यांनी तपास पुर्ण करुन आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३०४-अ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केल्याबद्दल दोषारोपपत्र पाठविले.

४. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरूध्द निशाणी १० कडे भा.दं.वि चे कलम ३०४-अ, २७९, ३३७ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये गुन्हा केल्याबाबत प्रतिकथन नोंदविले. आरोपीस त्यातील मजकूर वाचुन व समजावून सांगण्यात आला. त्याने गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षेची मागणी केली.

**५.** आरोपीविरुध्द गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने भाग-क मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण १० साक्षीदार तपासले आहेत. आरोपीतर्फे मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, वाहन तपासणी अहवाल इत्यादी कागदपत्र मान्य करण्यात आलेले आहेत. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवुनही इतर साक्षीदारांना हजर ठेवण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे दिनांक ०१.०४.२०२६ रोजीच्या निशाणी ०१ कडील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**६.** आरोपीचे फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी ७३ कडे नोंदविण्यात आले आहे. आरोपीने त्याच्या बचावाप्रित्यर्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला उलटतपास व आरोपीचे फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवदेन यावरून खोटी केस केल्याचा बचाव आरोपीने घेतला असल्याचे दिसून येते.

**७.** सहाय्यक सरकारी विधिज्ञ व आरोपीचे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर व उभय वकीलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे उपस्थितीत होतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद केलेल्या कारणांमुळे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र. एम.एच. ३७ ए.डी. ०९९० हे मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविले व अपघात केला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिताचे कलम २७९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २ | आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र. एम.एच. ३७ ए.डी. ०९९० हे वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून मोटर सायकल क्र. एम.एच.३७-४१८६ यास धडक देवुन अपघात केला आणि त्या अपघातात फिर्यादी व मयत नारायण जाधव यांना दुखापत पोहचविण्यास कारणीभूत झाला आणि त्याद्वारे त्याने भारतीय दंड संहिताचे कलम ३३७ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३ | आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र. एम.एच.३७-ए.डी. ०९९० हे वाहन मानवी जिवित धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवुन मोटर सायकल क्र. एम.एच.३७-४१८६ यास धडक देवुन अपघात केला व सदर अपघातात नारायण नामदेव जाधव यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आणि त्यायोगे त्याने भारतीय दंड विधान कलम ३०४-अ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ४ | आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र. एम.एच.३७-ए.डी. ०९९० हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे इतरांचे जिवतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे चालवले आणि याद्वारे मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ५ | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.०१ ते ०४ बाबत

८. उपरोक्त सर्व मुद्दे एकाच घटनेशी निगडीत असल्याकारणाने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रितरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

९. अभियोगपक्षाच्या कथनानुसार आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवून फिर्यादी व मयत नारायण

जाधव यांच्या मोटारसायकलला धडक दिली. आरोपीविरूद्ध दोषारोपीत केलेले गुन्हे सर्व शंकेपलीकडे सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. त्याकरीता आलेला पुरावा पाहणे गरजेचे आहे.

**१०.** साक्षीदार क्र.०१ हे फिर्यादी व जखमी साक्षीदार आहेत. त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, घटना दिनांक २२.०९.२०२१ रोजी दुपारी १२.०० ते १२.१५ वाजता कासोळा फाटा येथे घडली होती. ते कासोळा येथून सार्शी गावाकडे जात असताना मृतक नारायण जाधव हे मोटारसायकल चालवत होते, त्यावेळी एक पांढ-या रंगाची कार क्र. एम.एच.३७-ए.डी. ०९९० ही भरधाव वेगात आली व त्या कारने त्यांच्या मोटर सायकलला धडक दिली. त्यामुळे ते दोघे खाली पडले. त्यांना किरकोळ मार लागला होता व नारायण जाधव यांच्या डोक्याला जास्त मार लागला होता. धडक दिल्यानंतर कार समोर जावून थांबली. त्या कार चालकाला पोलीसांनी बोलावले असता कार चालकाने ते वाशिम येथील आर.टी.ओ. हिरडे असल्याचे सांगितले. त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की नारायण जाधव यांना रूग्णवाहिकेमध्ये वाशिम येथे दवाखान्यात नेले, परंतु त्यांना जास्त मार असल्यामुळे अकोला येथील आयकॉन हॉस्पीटल येथे पाठवले. तेथे उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

**११.** साक्षीदार क्र.०३ सुभाष व साक्षीदार क्र.०४ गजानन हे मृतक नारायण जाधव यांची मुले आहेत. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांचे वडिल व राजकुमार इंगोलकर हे सावडण्याचा कार्यक्रम आटोपून घरी येत असताना कासोळा फाटा येथे त्यांच्या मोटारसायकलचा कार सोबत अपघात झाला होता. त्या कारचा क्र. एम.एच.३७-ए.डी.०९९० असल्याचे त्यांना समजले होते. त्यांच्या वडिलांना डोक्यावर गंभीर दुखापत झाली होती व उपचारादरम्यान अकोला येथे त्यांचा मृत्यू झाला. सदर अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला होता.

**१२.** साक्षीदार क्र.०५ विठ्ठल हा देखील मृतक नारायण जाधव यांचा मुलगा आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक २२/०९/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता कासोळा फाटा येथे घडली होती. ते कार्यालयात असताना राजकुमार इंगोलकर यांनी त्यांना घटनेबाबत माहिती दिली. त्यांचे वडिल हे राजकुमार इंगोलकर यांच्यासोबत कासोळा येथुन वारा जहांगीर येथे जात असतांना एका ट्रकला कार क्र.एम.एच.३७-ए.डी.०९९० ही ओव्हरटेक करत असतांना त्या कारने मोटरसायकलला धडक दिली. उपचारादरम्यान त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला.

**१३.** साक्षीदार क्र.६ सचिन जाधव हे पोलिस कर्मचारी आहेत. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २२.०९.२०२१ रोजी माजी राज्यमंत्री सुभाष ठाकरे यांच्या पत्नीचा सावडण्याचा कार्यक्रम असल्यामुळे त्यांची नेमणुक कासोळा फाटा येथे करण्यात आली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत पो.कॉ. जावेद हे देखील होते. त्यादिवशी दुपारी १२.०० ते १२.३० वाजता एक पांढ-या रंगाची कार मंगरूळपीर बाजुकडुन वाशिम बाजुकडे भरधाव वेगात जात होती. त्यावेळी त्या कारच्या चालकाच्या मागील बाजुच्या दरवाज्यास मोटरसायकल धडकली. त्यामुळे मोटरसायकल चालक व पाठीमागे बसलेला व्यक्ती खाली पडले. त्यामध्ये मागे बसलेल्या व्यक्तीस किरकोळ मार लागला होता व मोटरसायकल चालकाच्या डोक्याला गंभीर मार लागला होता. त्यांनी चौकशी केली असता पाठीमागे बसलेल्या व्यक्तीचे नाव राजकुमार इंगोलकर व चालकाचे नांव नारायण जाधव असल्याचे समजले. त्यानंतर तो कार चालक त्यांच्याजवळ आला व त्याने तो आर.टी.ओ. असल्याचे सांगुन त्याचे नाव ज्ञानेश्वर हिरडे असल्याचे सांगितले. त्यावेळी सदर कार हिरडे हे चालवत होते.

**१४.** साक्षीदार क्र.७ अमोल भगत यांच्या पुराव्यात असे आले आहे

की, दिनांक २२.०९.२०२१ रोजी ते कामानिमित्त वाशिम येथे गेले होते. ते परत येत असतांना त्यांचे मित्र सचिन जाधव व जावेद बेनिवाले हे भेटल्यामुळे त्यांना बोलत ते थांबले होते. त्यावेळी मंगरुळपीर बाजुकडुन वाशिम बाजुकडे जाणा-या कारने कासोळा बाजुकडुन सार्सी बाजुकडे जाणा-या मोटरसायकलला धडक दिली. त्यावेळी मोटरसयाकलवर दोघेजण होते. मोटरसायकल चालकाच्या डोक्याला मार लागला होता व कानातुन रक्त येत होते. त्यांना आवाज आल्यामुळे ते, सचिन जाधव व जावेद बेनिवाले असे धावत गेले व त्यांना उचलले. त्यानंतर त्यांनी १०८ क्रमांकाच्या रुग्णवहिकेला फोन केला व वाशिम येथे दवाखान्यात पाठवुन दिले. ज्या कारमुळे अपघात झाला त्या कार चालकाला "ऐ मादरचोदा थांब अशी शिवी देवुन त्यांनी थांबायला सांगितले होते. त्यावेळी कारचे टायर फुटले होते व त्या कारचा क्रमांक एम.एच.३७-ए.डी.०९९० असा होता. त्या कार चालकाने तो वाशिम येथील आर.टी.ओ. असल्याचे सांगुन त्याचे नांव ज्ञानेश्वर हिरडे सांगितले होते.

**१५.** साक्षीदार क्र.८ मारोती हा मृतक नारायण जाधव यांचा भाउ आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांचा भाउ व राजकुमार इंगोलकर हे कासोळा येथे सावडण्याच्या कार्यक्रमाकरीता गेले असता ते परत येत असतांना त्यांना कासोळा फाटयावर कार क्रमांक एम.एच. ३७-०९९० याने धडक दिली. त्यांना सुभाष जाधव याने घटनेबाबत सांगितले. घटनेच्या वेळी ते शेतात होते. त्यांच्या भावाचा उपचारदम्यान मृत्यू झाला.

**१६.** साक्षीदार क्र.०९ जावेद यांना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २२. ०९.२०२१ रोजी सुभाष ठाकरे यांच्या पत्नीचा सावडण्याचा कार्यक्रम असल्यामुळे त्यांची नेमणुक कासोळा फाटा येथे होती. त्यांच्यासोबत सचिन

जाधव हे देखील होते. सदर दिवशी दुपारी १२.०० ते १२.३० वाजता मंगरुळपीर बाजुकडुन वाशिम बाजुकडे एक क्रेटा कार क्रमांक एम.एच. ३७-ए.डी.०९९० भरधाव वेगात जात असल्यामुळे मोटर सायकल कार चालकाच्या मागील बाजुस धडकली. त्यामुळे मोटर सायकल खाली पडली. मोटर सायकल चालक जाधव यांच्या डोक्याला मार लागला होता व इंगोलकर यांना किरकोळ मार लागला होता. त्यावेळी कार मधुन ज्ञानेश्वर हिरडे हे आले व त्यांनी आर.टी.ओ. असल्याबाबत ओळखपत्र दाखवले. त्यावेळी त्यांच्यासोबत कोणीही नव्हते व ते स्वत: गाडी चालवत होते.

**१७.** साक्षीदार क्र.१० हे तपासीक अंमलदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात तपासातील बाबी सांगितल्या आहेत.

**१८.** या ठिकाणी नमुद करण्यासारखी बाब म्हणजे आरोपीतर्फे मृतक नारायण जाधव यांचा शवविच्छेदन अहवाल व मरणोत्तर पंचनामा मान्य करण्यात आलेला आहे. आरोपीतर्फे अभियोग पक्षाच्या साक्षीदारांचा घेण्यात आलेला उलटतपास यावरुन मृतक नारायण जाधव यांचा अपघातामध्ये मृत्यू झाल्याची बाब आरोपीस विवादीत असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे नारायण जाधव यांचा अपघातामध्ये मृत्यू झाला होता हे स्पष्ट आहे. सदर अपघात हा आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालविल्यामुळे झाला किंवा कसे हे पाहावे लागेल.

**१९.** साक्षीदार क्र. ०१ यांच्या उलटतपासादरम्यान घटनेच्या वेळी कार क्र. एम. एच ३७ ए. डी. ०९९० ही निलेश राउत हा चालवित होता व आरोपी हा पाठी मागे बसलेला होता असा उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आला. सदरची बाब साक्षीदाराने नाकारलेली आहे. घटनेच्या वेळी त्याठिकाणी हजर असलेल्या साक्षीदारांनी कारमध्ये केवळ आरोपी हजर होता असे स्पष्ट कथन केलेले आहे. तपासादरम्यान निलेश राउत याने

पोलिस ठाण्यात सदर कार हजर केल्यावरुन ती जप्त करण्यात आली आहे. असे असले तरी, घटनेच्या वेळी सदर कार आरोपी चालवित नव्हता याबाबतचा कोणताही पुरावा आलेला नाही. एकंदरीत आलेल्या पुराव्यावरुन घटनेच्या वेळी आरोपी हाच सदर कार चालवित होता हे स्पष्ट होते.

२०. अभियोगपक्षाच्या कथनानुसार घटना ही कासोळा फाटा येथे घ ाडलेली आहे. त्यामुळे प्रथम घटनास्थळ पाहणे गरजेचे आहे. साक्षीदार क्र.२ पंजाब यांना घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २४.०९.२०२१ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्याकामी मंगरुळपीर ते वाशिम रस्त्यावर सार्सी फाटा येथे बोलवले होते. त्याठिकाणी पोलिस, फिर्यादी इंगोलकर व शैलेश नावाचा पंच हजर होते. घटनास्थळावर रक्ताचे पुसट डाग व पांढ-या पट्टया दिसुन आल्या. घटनास्थळावर टायरच्या खुणा दिसल्या नव्हत्या ही बाब त्यांच्या उलटतपासात आली आहे. तसेच वाशिम ते मंगरुळपीर हा रहदारीचा रस्ता असल्याचे ते उलटतपासात सांगतात.

२१. साक्षीदार क्र.१० तपास अधिकारी यांनी देखील तपासादरम्यान दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केल्याचे सांगितले आहे. सा.क्र.२ हे मृतक नारायण जाधव यांच्या गावातील असल्याचे सा.क्र.२ यांनी मान्य केले आहे. असे असले तरी, साक्षीदार हा केवळ गावातील व्यक्ती असल्यामुळे त्याचा पुरावा नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. सा.क्र.२ व आरोपी यांच्यामध्ये कोणताही वादविवाद असल्याची बाब आलेली नाही. अशा परिस्थीतीत कोणत्याही कारणाशिवाय सा.क्र.२ यांचा पुरावा नाकारता येणार नाही. नि.क्र.३२ कडील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता सदरचे घटनास्थळ हे वाशिम-मंगरुळपीर मुख्य रस्त्यावर कासोळा फाटा येथे असल्याचे दिसुन येते. सदर ठिकाणी कसोळा ते सार्सी जाणारा

रस्ता असल्याचे देखील त्यावरुन दिसुन येते. याचाच अर्थ, घटनेच्या ठिकाणी चौफुली आहे. यापूर्वीच नमुद केल्याप्रमाणे सदर घटनास्थळावर अपघात झाल्याची बाब विवादीत नाही.

**२२.** भारतीय पुरावा कायदयातील तरतुदी अन्वये आलेला पुरावा हा प्रत्यक्ष स्वरुपाचा असणे गरजेचे आहे. म्हणजेच ज्या व्यक्तीने घटना पाहिली अथवा ऐकली, त्याच व्यक्तीने पाहिल्याबाबत अथवा ऐकल्याबाबत पुरावा देणे गरजेचे आहे. त्यामुळे ऐकीव पुरावा हा ग्राहय धरता येत नाही. सा.क्र. ३ सुभाष, सा.क्र.४ गजानन, सा.क्र.५ विठ्ठल व सा.क्र.८ मारोती हे घटनेच्या वेळी प्रत्यक्ष घटनास्थळी हजर नव्हते. त्यांना घटनेची माहिती फोनद्वारे मिळाल्याचे त्यांनी त्यांच्या सरतपासात स्पष्ट कथन केलेले आहे. त्यामुळे घटनेबाबत त्यांचा पुरावा हा ऐकिव स्वरुपाचा आहे व तो पुर्णता: ग्राहय धरता येणार नाही. तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील कार भरधाव वेगात हयगयीने व निष्काळजीपणे चालविल्याचे कोणतेही कथन त्यांनी केलेले नाही. अशा परिस्थीतीत, अभियोग पक्षाची भिस्त सा.क्र.१, सा.क्र.६, सा.क्र.७ व सा.क्र.९ यांच्या पुराव्यावर विसंबुन राहते.

**२३.** सा.क्र.१ हे घटनेच्या वेळी मृतक नारायण जाधव यांच्या सोबत मोटरसायकलवर होते. घटनेच्या दिवशी मा.राज्यमंत्री सुभाष ठाकरे यांच्या पत्नीचा सावडण्याचा कार्यक्रम असल्यामुळे सा.क्र.६ व सा.क्र.९ यांची कासोळा फाटा येथे नेमणुक असल्याची बाब व त्यामुळे घटनेच्या वेळी ते दोघे तेथे हजर असल्याची बाब विवादीत नाही. तसेच घटनेच्यावेळी सा.क्र. ७ हे सा.क्र.६ व सा.क्र.९ यांच्याशी बोलत उभा असल्याची बाब देखील आरोपीस विवादीत नाही.

**२४.** मंगरुळपीर–वाशिम हा राज्य महामार्ग असुन सिमेंट रस्ता आहे. त्या रस्त्यावर येणा–या व जाणा–या वाहांनासाठी स्वतंत्र लेन/रस्ता

आहे. कासोळा येथुन सार्सी या गावी जाण्यासाठी मंगरुळपीर-वाशिम हा राज्य महामार्ग ओलांडावा लागतो. सदरच्या बाबी अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन दिसुन येतात. याठिकाणी नमुद करण्यासारखी विशेष बाब म्हणजे घटनेच्यावेळी मृतक नारायण जाधव व फिर्यादी राजकुमार हे कासोळा येथुन सार्सी कडे जात होते. त्याकरीता त्यांना मंगरुळपीर-वाशिम राज्य महामार्ग ओलांडायचा होता. त्यावेळी त्यांची मोटरसायकल आरोपीच्या कारला चालकाच्या मागील बाजुस धडकल्याचे सा.क्र.६ व सा.क्र.९ यांच्या पुराव्यातुन स्पष्ट होते. नि.क्र.७० कडील आरोपीच्या कारचा वाहन तपासणी अहवाल पाहिला असता त्यामध्ये कारच्या समोरील बाजुस कोणतेही नुकसान झालेले नाही. केवळ कारच्या उजव्या बाजुचे मागील चाकाचे नुकसान झालेले आहे. आरोपीच्या कारने मोटरसायकलला समोरुन धडक दिली असती तर निश्चितच कारचे समोरील बाजुचे नुकसान झाले असते. याउलट नि.क्र.६९ कडे मृतक व फिर्यादी जात असलेल्या मोटरसायकलच्या वाहन तपासणी अहवालाचे अवलोकन केले असता मोटरसायकलचे समोरील चाकाचे नुकसान झाल्याचे दिसते.

२५. मंगरुळपीर-वाशिम हा राज्य महामार्ग असल्यामुळे निश्चितच सदर रस्ता ओलांडांना तो रस्ता ओलांडणा-याची जबाबदारी काळजी घ ेण्याची होती. राज्य महामार्ग असल्यामुळे एखादे वाहन भरधाव वेगात असले तरी त्यावरुन चालकाचा निष्काळजीपणा होता असे मानता येणार नाही. फिर्यादीने फिर्याद देतेवेळी आरोपीच्या कारने मोटरसायकलला धडक दिल्याचे नमुद केलेले आहे. तसेच फिर्यादीने त्याच्या तोंडी पुराव्यात देखील आरोपीने कार भरधाव वेगात चालवुन मोटरसायकलला धडक दिल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थीतीत, सा.क्र.१ फिर्यादी व सा.क्र.६ आणि सा. क्र.९ यांच्या तोंडी पुराव्यात विसंगती दिसुन येते. सा.क्र.७ हे घटनेच्या वेळी तेथे हजर असले तरी ते बोलत असतांना त्यांना आवाज आल्यामुळे ते अपघ ाताच्या ठिकाणी गेल्याचे दिसुन येते. त्यांनी प्रत्यक्ष अपघात होतांना

पाहिलेला नाही.

**२६.** आरोपीविरुद्‌ध दोषारोपीत केलेले गुन्हे सर्व शंकेपलिकडे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. यापुर्वीच नमुद केल्याप्रमाणे साक्षीदार क्र.०१ फिर्यादी यांचा पुरावा विश्वसनीय नाही. त्याचप्रमाणे साक्षीदार क्र.३, सा.क्र.४, सा.क्र.५ व सा.क्र.८ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. साक्षीदार क्र.६ व सा.क्र.९ यांच्या तोंडी पुराव्यातुन आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयी अथवा निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकलला धडक दिल्याचे शाबीत होत नाही, याउलटत मृतक व फिर्यादी यांची मोटरसायकल आरोपीच्या कारला धडकल्याचे दिसुन येते. एकंदरीत अभिलेखावर आलेला पुरावा पाहता आरोपीविरुद्‌ध दोषारोपीत केलेले गुन्हे सर्व शंकेपलिकडे सिध्द झाल्याचे मानता येणार नाही. त्यामुळे मुद्‌दे क्र.०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ०५ बाबत</u>**

**२७.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ वरील निष्कर्षांमुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

**२८.** प्रस्तुत प्रकरणात एक क्रेटा कार क्रमांक एम.एच.३७-ए.डी. ०९९० ही निलेश राउत यांनी हजर केल्यावरुन जप्त केल्याचे दिसुन येते. तसेच सदर कारचा ताबा निलेश राउत यांना सुपूर्तनाम्याद्वारे दिल्याचे अभिलेखावरील कागदपत्रांवरुन दिसुन येते. सदर कारच्या ताब्याची मागणी इतर कोणीही केलेली नाही. त्यामुळे कारचा ताबा निलेश राउत यांच्याकडे अपील कालावधीनंतर कायम करणे योग्य वाटते.

**२९.** फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपील किंवा ईतर कार्यवाहीत हजर

राहण्याची हमी म्हणून आरोपीस जामीन देण्याकरीता आदेशीत करणे आवश्यक आहे. सबब आदेश–

**आदेश**

१. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये आरोपीस भा.दं.वि. चे कलम २७९,३३७,३०४–अ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा पुर्वीचा जामीन कद्बा रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये आरोपीने रक्कम रूपये ५०००/– चा जात मुचलका व जामीन कद्बा दयावा. आरोपीने दिलेला जात मुचलका व जामीन कद्बा आज पासून पुढे सहा महिन्यांपर्यंत परिणामकारक असेल.

४. जप्त क्रेटा कार क्रमांक एम.एच.३७–ए.डी.०९९० याचा निलेश गोवर्धन राउत यांच्याकडे सुपुर्तनाम्याद्वारे असलेला ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो. परंतु या न्यायनिर्णयाविरुद्ध अपिल केले असल्यास त्यातील आदेशाप्रमाणे सदर वाहनाचा ताबा देण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SUBHASH DATTARAO TARE

Digitally signed by SUBHASH DATTARAO TARE
Date: 2026.07.02 18:00:56 +0530

दिनांक :– ०२/०७/२०२६

(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | N.F. Syed (Stenographer-III) |
| Date of Judgment | :- | 02.07.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 02.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 02.07.2026 |